नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २९/०७/२०२५ (मंगळवार)

---

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या १० आरोपीतांविरूध्द नविन कायदा भारतीय न्याय संहीता २०२३ मधील किरकोळ संघटीत गुन्हेगारी च्या कलम ११२ अन्वये गुन्हा नोंद, आरोपींना अटक, मा. न्यायालयाने दिली पोलीस कोठडी

दिनांक २८/०७/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पेट्रोलीग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, **पोलीस ठाणे कन्हान अंतर्गत हरिहर नगर, वॉर्ड क्रमांक ०१, कांद्री येथे पडक्या घरात** काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ पंचासह घटनास्थळी पोहचुन धाड टाकली असता आरोपी नामे **१. अमन अन्वर खान,वय २४ वर्षे, रा. गणेश नगर, कन्हान २. सुशांत राजकुमार मेश्राम, वय २४ वर्षे, रा. प्रगती नगर, कन्हान ३. अभिषेक श्याम सूर्यवंशी, वय २४ वर्षे, रा. हरीहर नगर, कन्हान ४. अनिकेत राजू वैद्य, वय २३ वर्षे, रा. रायनगर, कन्हान,५. सागर युवराज चव्हाण, वय २६ वर्षे, रा. शिवनगर , कन्हान ६. अनंत सुमनलाल आटनकर, वय १८ वर्षे, रा. शिवनगर, कन्हान ७. रोहन युवराज चव्हाण, वय २४ वर्षे, रा. शंकर नगर, कन्हान ८. नरेश बाबुलाल धुर्वे, वय ३६ वर्षे, रा. हरीहर नगर, कन्हान ९. विनय विनोद भेलावे, वय २० वर्षे, रा. कन्हान १०. श्रीकांत भरत शेलारे, वय २७ वर्षे, रा. आंबेडकर नगर, कन्हान जि. नागपूर, हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ ताशपत्ते, ८,५०० रूपये रोख रक्कम तसेच ०४ आयफोन आणि ०६ अॅड्रॉईड मोबाईल, असा एकुण ३,८४,५००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर प्रकरणी नमुद आरोपीतांवर कलम १२ म.जु.का. सह कलम १४२ महाराष्ट्र पोलिस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला .**

**सदर गुन्हयातील आरोपी क्रं १ नामे अमन अन्वर खान, वय २४ वर्षे, रा. गणेश नगर, कन्हान हा नागपुर जिल्हयातुन हद्दपार असुन याचेवर २०२० पासुन अवैध जुगार, दंगा करणे, चोरी या सारखे अनेक गंभीर गुन्हे दाखल असुन सदर गुन्हयातील आरोपी क्रं २ ते १० या आरोपीतांचा त्या गुन्हयात सहभाग आहे. नमुद आरोपी हे संघटीतपणे गुन्हा करीत असल्याचे पोलीसांचे तपासात निष्पन्न झाल्याने सदर गुन्हयात मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात कन्हान पोलीसांनी भारतीय न्याय संहीता कलम ११२ (किरकोळ संघटीत गुन्हेगारी) हे कलम वाढ करणे बाबत प्रस्ताव श्री संतोष गायकवाड ,उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान यांचे कडे पाठवुन मंजुरी मिळवुन सदर गुन्हयात भारतीय न्याय संहिता कलम ११२ अन्वये वाढ करून वरील सर्व १० आरोपीतांना जुगाराच्या गुन्हयात अटक करून मा. प्रथमवर्ग न्यायालयात हजर केले असता मा. न्यायालयाने त्यांचा पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला आहे.** आरोपी क्रं १ नामे अमन अन्वर खान याला नागपुर जिल्हयातुन हद्दपार असतांना देखील मिळुन आल्याने मा.पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे हददपार आदेशाचे उल्लंघन केले आहे त्याबाबत सुध्दा त्याचे कारवाई करण्यात आली आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हया मध्ये अवैध जुगाराच्या गुन्हयातील आरोपीवर सुध्दा नविन कायदा भारतीय न्याय संहीता कलम ११२ (किरकोळ संघटीत गुन्हेगारी) अन्वये कडक कारवाई केली जात आहे.**

## मा.पोलीस अधिक्षक ,नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी घेतली बीट अधिकारी/अंमलदार यांची बैठक

दिनांक २९/०७/२०२५ रोजी मा. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रमीण जिल्हा यांनी पोलीस अधिक्षक कार्यालय नागपुर ग्रामीण येथे पोलीस स्टेशन अंतर्गत बीट मध्ये नेमलेल्या अधिकारी आणि अंमलदार यांची बैठक घेवुन त्यांच्या कामकाजांचा आढावा केला. मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रमीण जिल्हा यांची अवैध धंदयावर करडी नजर असुन त्यांनी बिट अधिकारी आणि अंमलदार यांना आपआपल्या बीट मध्ये अवैध धंदयावर कडक कारवाई अवैध

करण्याचे आदेश दिले तसेच अवैध दारू, अवैध रेती तस्करी आणि अवैध अंमली पदार्था बाबत कारवाईचा प्रत्येक बीट अधिकारी आणि अंमलदार यांचा वैयक्तिक आढावा घेण्यात आला. **सदर बैठकीत मा. पोलीस अधिक्षकांनी चांगले कामगिरी करणारे आधिकारी आणि अंमलदार यांना बक्षीस जाहीर केले तसेच कामगिरी न करणाऱ्या अधिकारी आणि अंमलदारांना शिक्षा सुध्दा करण्यात आली आहे.**





# नागपुर ग्रामीण जिल्हयात ग्रामभेटी घेवुन ग्रामस्थांसोबत पोलीसांनी साधला सुसंवाद

दिनांक २८/०७/२०२५ नागपुर ग्रामीण जिल्हयात उपविभागिय पोलीस अधिकारी यांनी त्यांच्या उपविभागातील गावांना भेटी देवुन तेथील नागरिकांची ग्रामसभा घेतली.

पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी अंतर्गत श्री दिपक अग्रवाल, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर उपविभाग यांनी टाकळघाट या गावाला भेट देवुन ग्रामस्थांची ग्रामसभा घेतली. पोलीस स्टेशन भिवापुर अंतर्गत श्रीमती वृष्टी जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग यांनी नक्षी गाव येथे भेट देवुन ग्रामस्थांची ग्रामसभा घेतली. पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांनी गहुहिवरा गाव येथे भेट देवुन ग्रामस्थांची ग्रामसभा घेतली. पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत श्री बापु रोहोम, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग यांनी रिधोरा गाव येथे भेट देवुन ग्रामस्थांची ग्रामसभा घेतली. पोलीस स्टेशन देवलापार अंतर्गत श्री रमेश बरकते उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग यांनी हिवरा पथरई  येथे भेट देवुन ग्रामस्थांची ग्रामसभा घेतली.

सदर ग्रामसभेला उपविभागिय पोलीस अधिकारी यांच्या सह संबधीत पोलीस स्टेशन चे प्रभारी अधिकारी आणि तेथील अंमलदार हजर होते. ग्रामस्थांची ग्राम सभा घेवुन पोलीसांनी ग्रामस्थांसोबत संवाद साधला. त्यांच्या अडीअडचणी जाणुन घेवुन त्यांचे निराकरण करण्यात आले. तसेच गावातील अवैध धंदयाबाबत माहीती गावकऱ्यांनी तात्काळ पोलीसांना दयावी असे अवाहन पोलीसांनी केले. तसेच सदर ग्रामसभेत पोलीसांनी सायबर क्राईम आणि त्याबाबत घ्यावयाची काळजी, रस्ते सुरक्षा ,महीला  व बालके यांची सुरक्षा याबाबत मार्गदर्शन करून जनजागृती केली. सदर ग्रामसभेला गावकऱ्यांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला.






अटल भूजल योजना
अटल भूजल योजना





# नागपुर ग्रामीण जिल्हयातील ६५९ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २९/०७/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २२ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६५९ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बोरी येथे ३५ आरोपी , ,पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण १०० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे २७ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे ३१ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २७ आरोपी अशा एकुण ११२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे २४ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण ११५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापरखेडा येथे ३२ आरोपी अशा एकुण ९५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे २७ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३६ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे १९ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २७ आरोपी अशा एकुण १०९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३४ आरोपी आणि

पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २८ आरोपी अशा एकुण १२८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सर्व ६ उपविभागातील सर्व २२ पोलीस स्टेशन एकुण ६५९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**




पोलीस स्टेशन
पारशिवनी
फोन नं. : ०७१०२-२२५१२३





# रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार तपासले आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक २८/०७/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक २९/०७/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री दिपक अग्रवाल, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत जुनी वस्ती आणि सातगाव येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले आणि एम.आय.डी.सी. चौक येथे नाकाबंदी केली. पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी बोरी अंतर्गत गंगापुर झोपडपट्टी येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले आणि गार्डन चौक येथे नाकाबंदी केली. सदर कोबिंग ऑपरेशन श्री दिपक अग्रवाल यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये स्थानिक पोलीस स्टेशन चे अधिकारी/अंमलदार हजर होते.










मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने